**International Journal of Advance and Applied Research**

www.ijaar.co.in

**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 7.328**

**Peer Reviewed** **Bi-Monthly**

**Vol.11 No.4** **March – April 2024**

# साधनाताई आमटे यांच्या कार्याचा ऐतिहासिक आढावा

**अरुण आलेवार**

*सहाय्यक प्राध्यापक तथा इतिहास विभाग प्रमुख*

*डॉ. अरुण मोटघरे महाविद्यालय*

*कोंढा - कोसरा, ता. पवनी, जि. भंडारा*

***Corresponding Author -** अरुण आलेवार*

**DOI - 10.5281/zenodo.15043072**

***सारांश:***

*साधनाताई आमटे या महाराष्ट्रातील प्रसिद्ध समाज सुधारक होत्या. विवाहानंतर साधनाताईंनी बाबाशी समरूप होऊन सामाजिक कार्यात सहभागी झाल्या.श्रमाश्रम,आनंदवन, कुष्ठरोग निवारणाचे कार्य आणि इतरही कार्यात बाबांच्या खांद्याला खांदा लावून कार्य केले. खरे तर साधनाताईंच्या विवाहानंतरचे संपूर्ण विश्व बदलले.साधनाताईंनी आयुष्यात खडतर प्रवास करीत अनाथ व कुष्ठमुक्तांसाठी संपूर्ण जीवन त्यांच्या सेवेत वाहून घेतले.साधनाताई अनाथ आणि कुष्ठरोग्यांच्या आई म्हणून परिचित होत्या.अनाथ, अपंग, अंध, वृद्ध आणि कुष्ठमुक्तांसाठी साधनाताई संजीवक ठरल्या. साहित्य क्षेत्रात समिधा नावाचं आत्मचरित्र लिहून साधनाताई साहित्यिक म्हणून पुढे आल्या. विदर्भ साहित्य संघाच्या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष म्हणून दिलेले भाषण महत्वपूर्ण ठरले.*

***बीजशब्द :** श्रमाश्रम, आनंदवन ,कुष्ठरोग, अनाथ, इतर कार्य*

**प्रस्तावना :**

प्राचीन काळापासून स्त्री जीवन रूढी परंपरेच्या नावाखाली बंदिस्त झाली होती. त्यामुळे स्त्रियांचा विकास खुंटलेला होता.१९ वे शतक भारतीय स्त्रियांसाठी निर्णायक कार्य ठरले. याच शतकात भारतात सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीने जोर धरला.बंगालमध्ये राजा राममोहन रॉय,ईश्वरचंद्र विद्यासागर ,केशवचंद्र सेन यांनी स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला.महाराष्ट्रात महात्मा ज्योतिराव फुले यांनी स्त्री शिक्षणाचा पुरस्कार करून १८४८ मध्ये मुलींची शाळा पुणे येथे सुरू केली. त्यामुळे भारतातल्या काही भागात स्त्री शिक्षणाला चालना मिळाली.पाश्चिमात्य शिक्षण स्त्री जीवनाला आकार देणारे ठरले. त्यामुळे महाराष्ट्रात सावित्रीबाई फुले,रमाबाई रानडे, आनंदीबाई जोशी, पंडिता रमाबाई यासारख्या अनेक महिलांचे नेतृत्व उदयास आले. उच्चशिक्षित महिलांनी महिला संघटना स्थापन करून स्त्रीचे प्रश्न सोडविण्यात पुढाकार घेतला. विसाव्या शतकात साधनाताई आमटे या प्रसिद्ध समाजसेविका म्हणून नावारूपास आल्या.साधनाताईंनी बाबा आमटे यांच्या प्रत्येक कार्यात सहभाग घेतला होता.समाज सुधारणेचे कार्य, आनंदवन, अशोकवन, सोमनाथ, हेमलकसा व मूळगव्हाण प्रकल्प उभारणीत साधनाताईचा योगदान महत्त्वाचा राहिला.साधनाताईंनी अनाथांना प्रेम देऊन आनंदवनात गोकुळ उभारले.त्यांनी कुष्ठरोग्यांना आपलेसे करून त्यांचा संसार उभा केला. एवढेच नव्हे तर बाबा आमटे यांनी भारत जोडो यात्रा व

नर्मदा बचाव आंदोलन उभारले होते.त्यात त्या सहभागी झाल्या.त्यांचे कार्य आजच्या पिढीला प्रेरणादायी आहे.साधनाताई आमटे यांचे कार्य तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी मी 'साधनाताई आमटे यांच्या कार्याचा ऐतिहासिक आढावा 'या शोधनिबंधाच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येणार आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे:**

१) साधनाताई आमटे यांच्या संपूर्ण जीवनचरित्राचा अभ्यास करणे.

२) साधनाताई आमटे यांनी केलेले कार्य अभ्यासणे.

३) साधनाताईच्या त्याग वृत्तीचा आढावा घेणे.

**गृहीतके:**

१) साधनाताईच्या कार्यामुळे कुष्ठरोग्यांच्या जीवनात बदल घडले.

२) साधनाताईंनी अपंग, अंध आणि कुष्ठरुग्णाकडे पाहण्याचा समाजाला सकारात्मक दृष्टिकोन दिला.

३) साधनाताईंनी कुष्ठरुग्णांना सन्मानाने जगण्याची दिशा दाखवली. पण अजूनही समाजात कुष्ठरुग्णाबद्दल तिरस्कार यांची भावना कमी झाली नाही.

**संशोधनाची गरज व आवश्यकता:**

साधनाताई आमटे यांच्या कार्याची दखल जागतिक स्तरावर बाबा आमटे यांच्यासोबत घेतल्या गेली.त्यांनी समाज सुधारणेच्या पलीकडे जाऊन अनाथांची माय म्हणून त्यांचा सांभाळ केला. बाबांनी कुष्ठरोग्यांना आधार देऊन कुष्ठमुक्त केले.पण त्यांचा संसार उभा करण्याची जबाबदारी साधनाताईंनी पूर्ण केली.साधनाताईंच्या सहकार्याशिवाय बाबा यशस्वी होऊ शकले नसते. म्हणून त्यांच्या कार्याचे महत्त्व पुढील प्रमाणे सांगता येतील.

१) साधनाताईंच्या संपूर्ण कार्याचा आढावा घेता येईल.

२) साधनाताईंनी बाबा आमटे यांनी उभारलेल्या भारत जोडो यात्रा व नर्मदा बचाव आंदोलनातील सहभाग जाणून घेता येईल.

३) साधनाताई आमटे यांच्या इतरही कार्यावर प्रकाश टाकण्यात येईल.

**संशोधन पद्धती:**

साधनाताई आमटे यांच्या कार्याचा ऐतिहासिक आढावा या शोधनिबंधाकरीता ऐतिहासिक संशोधन पद्धती मधील विश्लेषण पद्धतीचा वापर करण्यात येईल.तसेच प्राथमिक ,दुय्यम साधने आणि वर्तमानपत्राचा आधार घेण्यात येईल.

**साधनाताई यांचा अल्पपरीचय:**

पूर्वाश्रमीच्या इंदु घुले यांचा जन्म ५ मे १९२६ रोजी नागपूर येथे झाला. त्यांचे घराणे सनातनी आणि धार्मिक होते. त्यांचे वडील सरकारी नोकरीत असताना राजीनामा देऊन घुले वस्त्र भंडार नावाची दुकान सुरू केले. इंदु दहा वर्षाची असताना वडिलांचे निधन झाले.त्यामुळे त्यांच्या आईंना चार मुलींची जबाबदारी सांभाळावी लागली. इंदु शिक्षणात हुशार होत्या. त्यांनी शिक्षण घेत असताना अनेकदा प्रथम क्रमांक पटकाविले होते. इंदूचा स्वातंत्र्य चळवळीशी संबंध आला तो फक्त प्रभात फेरी पुरताच होता. त्यावेळी सर्व

बालमंडळी नागपुरात प्रभात फेरीत सहभागी होत. वि. दा. सावरकर यांची अंदमानतून सुटका झाल्यानंतर नागपुरातल्या कस्तुरचंद पार्क येथे सत्कार करण्यात आला. त्यावेळी इंदुने या सोहळ्यात स्वागत गीत म्हटले. त्यावेळी वि. दा. सावरकरांनी इंदुची पाठ थोपटून कौतुक केले. इंदु लहान मुलांबरोबर खेळत असल्यामुळे त्यांची आई त्यांना प्रेमाने मुक्तस्तंभ म्हणत होती.१९४४ मध्ये इंदू मॅट्रिक उत्तीर्ण झाल्या.परंतु घरातील जबाबदारीमुळे त्यांना पुढील शिक्षण घेता आले नाही.इंदु या जरी सनातन कुटुंबातील असल्या तरी त्यांना समाजातील काही वाईट परंपरा पाहून तितकारा वाटत होता.कारण त्या बुद्धीला पटणाऱ्या गोष्टी नव्हत्या. परंतु त्यांना कराव्या लागत होत्या, याचे त्यांना वाईट वाटे. बाबाच्या निधनानंतर आईला केशवपन न करण्याची इच्छा त्यांनी बोलून दाखवली होती. इंदु जरी धार्मिक वातावरणात वाढल्या असल्या तरी त्यांच्यात सामाजिक जाणीवांची चुणूक दिसून आली. ताईना सामाजिक कार्याची आवड होती. लग्नापूर्वी ताईंनी सामाजिक कार्याचा श्रीगणेशा केला.हरिजन वसाहतीतील लोकांना सार्वजनिक नळावर पाणी भरायला बंदी होती हे पाहून साधना ताईंनी स्वतःच्या वाड्यातील विहिरीचे पाणी काढून या लोकांना देण्याचे कार्य केले. इंदूच्या शांत जीवनात बाबा आमटे आले. बाबांनी इंदुमधील करुणा,दयाभाव आणि कर्तृत्व हे गुण पाहून विवाहासाठी योग्य ठरविले. अशा प्रकारे १८ डिसेंबर १९४६ ला इंदुचा बाबाशी विवाह झाला. नंतर त्या साधनाताई आमटे या नावाने ओळखल्या गेल्या.अशाप्रकारे त्यांची एका जगावेगळया संसाराला त्यांची सुरुवात झाली.

**श्रमाश्रम प्रयोग :**

बाबा आमटे यांनी आपल्या वैभवाचा त्याग करून सामाजिक कार्याकडे वळले.त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवून साधनाताई सामाजिक कार्यात उतरल्या. वरोडयातील हरिजन वस्तीमध्ये जाऊन तेथील गरीब लोकांना आपल्या हक्क व अधिकाराविषयी त्यांच्यात जाणीव निर्माण करीत होते. आमटे दांपत्याच्या कार्याकडे पाहून त्या लोकांचे आमटे यांच्या घरी येणे सुरू झाले.साधनाताई त्या वस्तीतील मुलांना शिकविले.त्यामुळे घरमालकाने आमटे दांपत्यांना घर सोडायला लावले.त्यानंतर बाबा आमटे वरोड्यातील रा. कृ. पाटील यांच्या वाड्यात राहावयास गेले. तेथे बाबांनी ऑक्टोबर १९४७ मध्ये श्रमाश्रम साम्यकुल प्रयोग सुरू केला. हा प्रयोग गांधीजी आणि विनोबा भावे यांच्या विचारधारेवर आधारित होता. यात सामुदायिक जीवन कस जगायचं हा उद्देश होता.त्या अनुषंगाने आमटे दांपत्यांनी महार, मांग,हिंदू, मुस्लीम अशा समाजातल्या दहा वीस स्त्री-पुरुषांना घेऊन सामुदायिक जीवन जगण्याचा प्रयोग सुरू केला. प्रत्येकानी आपली कामे करावी. विषमतेला तिथे स्थान नव्हतं. बाबा सोबत साधनाताईंनी शेतीचे काम, आजाऱ्यांची सेवा व स्वयंपाकाची जबाबदारी पार पाडली.तसेच साधनाताई श्रमाश्रम मध्ये राहणाऱ्या लहान बालकांची आंघोळ करून देणे आणि केस विंचरणे ही कामे केली. श्रमाश्रम मध्ये सतत त्यावेळी आर्थिक टंचाई होती. तरी पण त्या जगण्यात मानसिक समाधान होता असे साधनाताई लिहितात.या प्रयोगामुळे सामाजिक विषमता नष्ट होण्याचा प्रयत्न आमटे दांपत्यांनी केला. जवळपास दिड वर्ष हा प्रयोग चालला. नंतर तो बंद पडला. साधनाताई लिहितात,'आर्थिक अडचण आणि साथीचे रोग यामुळे

साम्यकुल विस्कटले. मात्र मी झाडू, फळे तयार करायला शिकले.त्यावेळी डॉ. भन्साळी घरी आले असताना त्यांना तयार केलेले झाडू भेट म्हणून दिले. त्यावर ते पुढे मला म्हणाले,आय विल ट्राय टू रिमुव्ह डर्ट ऑफ सोसायटी बाज दिज ब्रुम्स.'बाबांचे श्रमाश्रम मधील कार्य पाहून साधनाताईना भविष्यात कार्य करण्याची प्रेरणा मिळाली.

**आनंदवनची उभारणी :**

बाबा आमटे श्रमाश्रमच्या अपयशाने खचून न जाता आपले सामाजिक कार्य सुरू ठेवले होते. बाबा आमटे वरोड्यात मैला वाहून नेत असताना तुळशीराम नावाचा कुष्ठरोगी गटारात पडलेला दिसला. त्यावेळी बाबा घाबरले आणि घरी गेले. त्या गटारात पडलेल्या तुळशीरामला घरी आणून साधनाताईंच्या मदतीने उपचार केले. परंतु तो वाचू शकला नाही. याचे शल्य बाबांना झाले.त्याच दिवशी साधनाताईच्या पुढे बाबांनी कुष्ठरुग्णांच्या सेवेला वाहून घेण्याचा संकल्प केला. बाबांच्या कार्याची दिशा निश्चित झाली. आमटे दाम्पत्यांनी वरोडा येथील मित्रांच्या मदतीने १९४९ ला महारोगी सेवा समितीची स्थापना केली.बाबा आमटे कुष्ठरोगावरील अभ्यासक्रम पूर्ण करून कलकत्ता येथून परतले.१९५१ ला महारोगी सेवा समितीची नोंदणी संस्था म्हणून झाली. त्यानंतर मध्य प्रांत आणि वऱ्हाड सरकारने १९५१ ला महारोगी सेवा समितीला ५० एकर जागा वरोड्यापासून पाच किलोमीटर अंतरावर दिली. शासनाने दिलेल्या जमिनीवर काटेरी झाडेझुडपे होती. बाबांचा पहिला कार्यकर्ता साधनाताई होत्या. साधनाताई लिहितात,'आम्ही सर्वजण पहाटे चार वाजता उठून पायी जात.सोबत जेवणाचा डबा आणि पाणी नेत.तसेच लहान मुलांना चालवित आनंदवनांचे जंगल गाठून जंगल साफ केले.'यावरून साधनाताईंचा सहभाग लक्षात येतो. त्या ठिकाणी सुरुवातीला तट्टयाची एक झोपडी बांधली. सहा कुष्ठरुग्ण, पन्नास एकर जागा,१४ रुपये आणि एक गाय एवढ्या जमापुंजीवर ताई बाबांनी कामाला सुरुवात केली. ताईची प्रकृती ढासळलेली होती.तर बाबांचे खांदे दुखणे सतत सुरू होते. त्याची परवा न करता बाबा ताई कामाला लागले. कुष्ठरुग्णाशिवाय इतर कुणाचही त्यावेळी सहकार्य मिळाले नाही.तरीपण आमटे दाम्पत्यांनी तरुण वयात केलेला संकल्प जगावेगळा होता. कुष्ठरोगी म्हटले तर समाजात त्यांना जागा नव्हती.बाबांनी कुष्ठरोगी शोधून त्यांच्यावर उपचार सुरू केले. नंतर आनंदवनात दुसरी झोपडी तयार झाली २५ जून १९५१ ला विनोबा भावे यांच्या हस्ते आनंदवनाचे उदघाटन झाले.विनोबा भावेंनी यावेळी बाबांचे कार्य पाहून या ठिकाणी सेवेचे रामायण लिहिल्या जाईल असे म्हटले. विनोबांचे म्हणणे आमटे दाम्पत्यांनी भविष्यात खरे करून दाखविले. हा काळ धामधुमीचा होता.बाबा आणि ताईला एकाच वेळी अनेक जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागल्या. बाबा कुष्ठरुग्णांवर उपचार करीत.तर ताई आनंदवनाची स्वयंपाकाची जबाबदारी पार पाडीत. त्याशिवाय साधनाताईंनी भांडी घासणे,पाणी भरणे ,गाईचे दूध काढणे आणि शेतातली कामे केली. बाबांचे आनंदवनांचे स्वप्न प्रत्यक्षात सत्यात उतरविण्यासाठी साधनाताईंचा मोठा वाटा होता. साधनाताईंचे कार्य पाहून अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे यांनी त्यांना 'जगदंबा' म्हटले. आनंदवनासाठी कष्ट उपसणाऱ्या आमटे दांपत्यांना आपल्या मुलांकडे लक्ष द्यायला वेळ नव्हता. ताई बाबांच्या कुष्ठरोग निवारणाच्या चळवळीत सहभागी झाल्या. पाहता पाहता आनंदवनाचा विस्तार झाला. कुष्ठरुग्ण बरे होऊन तिथेच शेतीकाम ,विणकाम

,बांधकाम आणि इतर प्रकल्पात कार्य करू लागले. खंगलेले हात आणि बोटे आनंदवनाच्या विकासात महत्त्वाची ठरली. आनंदवनाची महत्ती परदेशात गेली. एस. सी. आय. या आंतरराष्ट्रीय संस्थेने आपले स्वयंसेवक पाठवून आनंदवनात बरेच कार्य केले.अनेक इमारती उभ्या झाल्या. यामुळे आमटे दाम्पत्यांना आनंदवनात कुष्ठमुक्तांचे पुनर्वसन करता आले. उपचाराला गती मिळाली.बाबांनी आनंदवनातील कुष्ठमुक्तांना श्रमनिष्ठ केले.

आनंदवनाने कुष्ठरुग्णांना आत्मसन्मान आणि आर्थिक स्थैर्य मिळवून दिले होते.पण आपली सुख दुःख वाटण्यासाठी जोडीदार असणे गरजेचे होते. ही गरज ताईंनी ओळखली.म्हणूनच साधनाताईंनी कुष्ठमुक्त जोडप्यांच्या विवाहाचे प्रस्ताव मांडले. पण त्यावेळी बाबांनी विरोध केला. पण शेवटी बाबा नरमले. साधनाताई ंची संकल्पना नंतर आवडली .१९६२ मध्ये कुष्ठमुक्तांचे विवाह सोहळे पार पडले .महारोग्यांचे जीवन बाबांनी घडविले असले तरी संसार मात्र साधनाताईंनी उभे केले. यामुळे आनंदवनात कुष्ठरुग्णांचे प्रेमळ संसार सुरू झाले.

१९६२ ला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या हस्ते मुक्तीसदनचे उद्घाटन झाले.त्या रोगमुक्त झालेल्या रुग्णांसाठी सदन स्थापन केलेला होता. मुक्तीसदनामध्ये कुष्ठमुक्त जोडपी आणि इतर रुग्णांची व्यवस्था करण्यात आली.

१९५४ ला अनाथ मुलगी माया रस्त्याच्या खड्यात पडलेली मिळाली.त्यावेळी तिला आनंदवनात आणले. ताई आणि बाबांनी तिला प्रेम दिले.पण ती सहा महिन्यांत मरण पावली.यामुळे आमटे दाम्पत्यांना धक्का बसला.नंतर अनेक अनाथ मुली तिथे राहावयास आल्या. धरती,बिजली आणि रेणुका यासारख्या अनेक अनाथ मुलींचे ताई आणि बाबांनी संगोपन केले. एवढेच नव्हे तर त्यांचे पालकत्व सुद्धा स्वीकारले होते. ताई या मुलांच्या आई झाल्या,आजी झाल्या. सर्व लहान मुलांना त्या स्वतःजवळ घेऊन झोपायच्या.अनेक अनाथ मुलींचे विवाह करून दिले. काही अनाथ मुली आनंदवनात साधनाताई सोबत कार्य करीत होत्या.गोकुळ मधील मुलांच्या जीवनाला आकार देण्याचे काम ताईंनी केले.

बाबांनी आनंदवनात टीन कॅन प्रोजेक्ट, संधीनिकेतन, उत्तरायण, मुक्तिसदन, कृषी निकेतन, मित्रांगण, स्नेहसावली,मुक्तांगण, लघुउद्योग,स्वरानंदन आणि बालतरूची पालखी या नावीन्यपूर्ण उपक्रमात साधनाताई सहभागी होत्या. उत्तरायणमधील वृध्दांना ताई आपल्या हाताने भोजन देत होत्या.त्यांची आस्थेने विचारपूस करीत असत.

त्याचप्रमाणे बाबांनी आनंदवनाचा विस्तार करण्याचे ठरविले.त्या अनुषंगाने अशोकवन ,सोमनाथ, नागेपल्ली हेमलकसा आणि मूळगव्हाण या ठिकाणी प्रकल्प उभारले.या प्रकल्प उभारणीत साधना ताईंनी मोलाची भूमिका बजावली होती. सोमनाथ या ठिकाणी जागा मिळाल्यावर ताई व बाबा गेले.ताईंनी सोमनाथ मंदिराच्या गोमुखातून डोक्यावर हंडे भरून पाणी आणले. तसेच तिथे सर्व व्यवस्था करेपर्यंत ताईंनी बरेच कष्ट उपसले. या ठिकाणी नवतरुणाईला प्रेरणा देण्यासाठी बाबांनी श्रमसंस्कार शिबिरे आयोजित केले.या शिबिरात ताईंनी मोलाची भूमिका बजावली. सडा, रांगोळी, स्वयंपाक आणि आजारी पडलेल्या स्वयंसेवकांची सेवासुश्रुषा सुद्धा केली. हेमलकसा लोक बिरादरी प्रकल्प आज आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्धी मिळविलेला आहे. या प्रकल्पाची उभारणी 1972 ला झाली. आरोग्य, शिक्षण आणि शेती हा त्याचा मुख्य

हेतू होता.ताई तिथे जाऊन प्रकल्प उभारणीत मदत केली. आज डॉ. प्रकाश व डॉ. मंदा आमटे यांच्या पुढाकाराने सुरू आहे. यातून माडीया बांधवांना अनेक प्रकारच्या सेवा देण्याचं कार्य सुरू आहे.

आनंदवनातील कोणतेही काम असो स्त्री-पुरुष एकत्रित काम करायचे.त्यामुळे काम ते उत्तम प्रकारे झाले. हॉस्पिटल, शेतीकाम आणि बांधकाम येथे महिलांचा सहभाग होता. बाबा उपस्थित नसले. तर मातोश्री साधनाताई ते काम सांभाळीत होते. घरातली कामे आटपून ताई आनंदवनातील आर्थिक व्यवहाराकडे लक्ष ठेवत होते. ताईंनी कधीही कंटाळा केला नाही.त्रास होतो असे म्हटले नाही.बाबांना सदैव साथ देणाऱ्या ताईंनी आनंदवनाच्या अनेक तक्रारी सोडविण्याचे काम पण त्यांनी केले. खरेदी असो किंवा इतर काम बाबाबरोबर ताईचा प्रवास ठरलेला होता.अशोकवन ,सोमनाथ नागेपल्ली,हेमलकसा आणि मुळगव्हाण येथे साधनाताई येथे जात होत्या. सहचारिणी म्हणून बाबासोबतचा त्यांचा आयुष्याचा चढ-उताराचा प्रवास त्यांनी पाहिला. म्हणूनच आनंदवनाच्या विकासात पुरुषाइतकाच स्त्रियांचा सुद्धा मोलाचा वाटा होता.

**इतर कार्यात सहभाग:**

कुष्ठरोग्याच्या सेवेबरोबरच आमटे दांपत्याने आनंदवनात उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. १९६४ ला आनंदीकेतन कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय स्थापन केले. तसेच१९६५ ला आनंदनिकेतन कृषी महाविद्यालय स्थापन झाले. शेतकऱ्यांची मुले शेतीचे धडे घेऊ लागली. आमटे दांपत्यांनी अंध, अपंग व मुकबधीर यांच्या शिक्षणाकडे लक्ष घातले.१९६६ मध्ये आनंदवनात अंधशाळा सुरू झाली. मग १९८३ मध्ये कर्णबधीरांची शाळा स्थापन केल्या गेली.बाबा इतर कामानिमित्त आनंदवनाच्या बाहेर असताना साधनाताई शिक्षण संस्थेची सर्व कामे व्यवस्थितपणे पार पाडले.त्यांच्या मदतीला डॉ. विकास आमटे होते. एकूणच आमटे दाम्पत्यांनी सामाजिक दायित्वासोबत उच्च दर्जाची शिक्षण संस्था उभारून विकासाला चालना दिली.यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थी उंच भरारी घेऊ शकला.

विदर्भ साहित्य संघाचे ३४ वे संमेलन १९८३ ला राम शेवाळकरांच्या पुढाकाराने आनंदवन मध्ये झाले.संमेलनाचे अध्यक्ष गंगाधरराव पाणतावणे व उदघाटक तीर्थकर लक्ष्मणशास्त्री होते.या संमेलनाचे स्वागताध्यक्ष होण्याचा मान साधनाताईंना मिळाला.त्यावेळी त्यांनी स्वागताध्यक्ष पदावरून प्रभावी मार्गदर्शन केल्याने त्यांची साहित्यिक म्हणून गणना झाली.तसेच गडचिरोली जिल्ह्यातील सर्च येथे आयोजित केलेल्या शिबिरात साधनाताई मुख्य अतिथी म्हणून केलेले मार्गदर्शन स्त्री-पुरुषांसाठी प्रेरणादायी होते. साधना ताईंनी डॉ.अभय व डॉ.राणी यांच्या कार्याचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर देशात अस्थिरतेची स्थिती निर्माण झाली. २४ डिसेंबर १९८५ ला भारत जोडो यात्रेला बाबांनी सुरुवात केली.साधनाताई या भारत जोडो यात्रेमध्ये सहभागी नव्हत्या.परंतु त्या बाबाच्या कार्याला पाठिंबा देण्यासाठी कन्याकुमारी येथे हजर झाल्या.त्यांनी भारत जोडो यात्रेच्या सायकल मार्चला हिरवी झेंडी दाखवली.या यात्रेला अभूतपूर्व असा पाठिंबा मिळाला होता. तसेच १९८६ ला बाबा आमटे यांनी पंजाबला तीनदा भेटी दिल्या. त्यावेळी साधनाताई व डॉ. प्रकाश आमटे पंजाब मध्ये प्रवेश होतांना सोबत होत्या.तेथील

लोकांची मने पाहून ताईचे मन उदास झाले. साधनाताई जास्त काळ भारत जोडो यात्रेत सहभागी होता आले नाही.कारण संस्थेची जबाबदारी ताईकडे होती.मात्र या भारत जोडो यात्रेची वेळोवेळी ताई माहिती घेत होत्या.यावरून त्यांच्यात असलेली आपल्या देशाबद्दलची तळमळ लक्षात येते.

१९९० ला बाबा आमटे नर्मदा बचाव आंदोलनात सहभागी होण्यासाठी आनंदवन सोडून नर्मदातिरी कसरावद येथे राहावयास गेले.त्यावेळी साधनाताई त्यांच्या सोबतीला होत्या. मेधा पाटकर या आंदोलनाच्या सर्वेसर्वा होत्या. बाबांनी या नर्मदा बचाव आंदोलनाचे नेतृत्व स्वीकारले. नर्मदा नदीवरील धरणामुळे हजारो आदिवासी बांधव आणि सर्वसामान्य लोक विस्थापित होणार होते.तसेच पर्यावरणाचा ऱ्हास होणार होता. बाबांनी या आंदोलनात तेथील आंदोलन करताना मार्गदर्शन केले. त्यामुळे नर्मदा बचाव आंदोलन पेटला. साधनाताईंनी हे आंदोलन जवळून बघितले.धरणाच्या समर्थकांकडून साधनाताईंना अपमान सहन करावा लागला होता.भोपाळ येथे सत्याग्रहींना ताब्यात घेतले.या गर्दीत साधनाताई खाली पडल्या.त्यांना बराच मुका मार लागलेला होता.साधनाताई कसरावद या ठिकाणी असताना अधून मधून आनंदवनात येऊन आपली कामे करीत होती.१९९३ ला मुंबईत दंगल उसळली त्यावेळी आमटे दाम्पत्य मुंबईत जाऊन हिंदू मुस्लिमांचे सांत्वन केले. अशा या कर्तृत्वावर समाजसेविका साधनाताई आमटे यांचा कर्करोगाच्या आजाराने ९ जुलै २०११ ला निधन झाला.

**निष्कर्ष:**

साधनाताई धार्मिक वातावरणात वाढल्या पण विवाहानंतर जगावेगळ्या संसाराला सुरुवात केली.आमटे दांपत्याने श्रमाश्रमाचा प्रयोग सुरू करून सामुदायिक जीवन जगण्याची प्रेरणा दिली. आमटे दाम्पत्याने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत समाजाने नाकारलेल्या कुष्ठरोग्यांची सेवा करून त्यांना आर्थिक स्वावलंबी केले. साधनाताईंनी सुरुवातीपासून शेवटपर्यंत बाबांच्या प्रत्येक कार्यात सहभागी होऊन बाबाच्या पाठीशी त्या खंबीरपणे उभ्या राहिल्या.बाबांनी उभारलेल्या प्रत्येक नाविन्यपूर्ण प्रकल्पात यशस्वी करण्यामध्ये साधनाताईंचा सिंहाचा वाटा आहे.साधना ताईंनी आनंदवनाची सहसचिव पदाची जबाबदारी यशस्वीरित्या सांभाळली. साधनाताईंनी कुष्ठरोग्यांबरोबरच अनाथ, अपंग,अंध आणि आदिवासी अशा अनेकांवर मायेची पाखर घातली. सगळ्या आनंदवनाची ताई म्हणून त्या ओळखल्या जात होत्या.आज आनंदवन जगात प्रसिद्ध आहे याचे श्रेय बाबासोबत ताईंना पण जाते. म्हणून आज साधनाताईंच्या कार्याची प्रेरणा घेणे काळाची गरज आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची:**

१) आमटे साधना, समिधा, पॉप्युलर प्रकाशन पुणे, सप्टेंबर २०२३, सहावी आवृत्ती.

२) धर्माधिकारी तारा,अनुवाद डॉ.हेमा जावडेकर,बाबा आमटे, नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया नई दिल्ली,२०००, पहला संस्करण.

३) आमटे डॉ.विकास, शब्दांकन - गौरी कानेटकर, आनंदवन प्रयोगवन, समकालीन प्रकाशन पुणे, सप्टेंबर २०१४,प्रथम आवृत्ती.

४) काटकर घोगरे सुचित्रा, समाजभूषण बाबा आमटे, गंधर्व वेद प्रकाशन पुणे,२०१२, द्वितीय आवृत्ती.

५) मिरचंदानी निशा, अनुवाद लीना सोहनी,अमरजीत बाबा आमटे यांचे जीवन चरित्र,मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे,सप्टेंबर २०२०, आठवी आवृत्ती.

६) द्वादशीवार सुरेश, करुणेचा कलाम :चिंतन बाबा आमटे, विद्याप्रकाश पब्लिशर्स प्रा. लि. नागपूर , १ नोव्हेंबर २०१७, सुधारित आवृत्ती.

७) भानू सिमा, प्रकाश वाटा डॉ. विकास आमटे,समकालीन प्रकाशन पुणे, जानेवारी २०२२,चाळीसवी आवृत्ती.

८) बापट भ. ग. , बाबा आमटे, राजहंस प्रकाशन प्रा.लि. पुणे, मे २०२३, चौदावी आवृत्ती.

९) गुजराती अशोक,बाबा आमटे खुशबू का अहसास,राष्ट्रीय पुस्तक न्यास भारत नई दिल्ली,२०११,प्रथम संस्करण.

१०)द्वादशीवार सुरेश,तारांगण,साधना प्रकाशन पुणे, १ जानेवारी २०११, प्र. आ.

११)महाराष्ट्र टाईम्स १६.०२.१९८६

१२)लोकमत ०९.०७.२०११

१३)नवभारत टाइम्स १०.०७.२०११